दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १७८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२३ सप्टेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## २५ कोटींचे अंमली पदार्थ मुंबई विमानतळावर जप्त

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई विमानतळावर तब्बल २५ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून, याप्रकरणी दोन परदेशी महिलांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

कोरोना काळात अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांचे प्रमाण वाढल्यामुळे सीमाशुल्क विभागाकडून मुंबई विमानतळावर विशेष दक्षता घेतली जात आहे. रविवारी मध्यरात्री जोहान्सबर्गहून आलेल्या दोन महिलांच्या संशयास्पद हालचाली हेरून अधिकाऱ्यांनी त्यांची तपासणी केली. त्यांनी आपल्या बॅगमध्ये छुप्या पद्धतीने हेरॉईन लपवून आणल्याचे तपासणीत उघड झाले. त्यामुळे या महिलांना ताब्यात घेण्यात आले.

त्यांच्याकडून एकूण ५ किलो हेरॉईन जप्त करण्यात आले असून, त्याचे बाजारमूल्य २५ कोटी रुपये इतके आहे. याप्रकरणी ५२ वर्षीय महिला आणि तिच्या ३३ वर्षीय मुलीला अटक करण्यात आली आहे. अमली पदार्थ वाहक म्हणून या महिलांचा वापर करण्यात आला होता.

भारतात ५ किलो हेरॉईन पोहोचविण्याच्या मोबदल्यात त्यांना ३.७ लाख डॉलर देण्यात येणार होते. मुंबईत दाखल झाल्यानंतर एका हॉटेलमध्ये हे अमली पदार्थ संबंधितांना सोपविले जाणार होते. या महिलांच्या मागावर तपास यंत्रणा नसल्याची खात्री केल्यानंतरच दलाल त्यांना भेटणार होते.

या महिला संबंधित दलालांना कोणत्या हॉटेलमध्ये भेटणार होत्या, त्यांना कोणाकडून संपर्क केला गेला याचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून सातत्याने अमली पदार्थ जप्त केले जात असून ते नेमके कुणासाठी आणि कशासाठी आणले जात आहेत याचा पोलीस सध्या शोध घेत आहे.

# मुंबई वगळता सर्व महापालिकांसाठी त्रिसदस्यीय प्रभाग पद्धत ; मंत्रिमंडळाचा निर्णय

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**महाविकास आघाडी सरकारने मोठा निर्णय घेत मुंबई वगळता राज्यातील सर्व महापालिकांच्या निवडणुकीत ३ सदस्यीय प्रभाग पद्धत आणण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईत मात्र एक वॉर्ड पद्धत असणार आहे. या बरोबरच नगरपालिका आणि नगरपरिषदेत मात्र द्वीसदस्यीय प्रभाग पद्धत असणार आहे. तर, नगरपंचायतीला १ सदस्यीय पद्धत ठेवण्यात आली आहे. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे असणार आहे.**




पालिकांच्या निवडणुकीत ४ सदस्यीय प्रभाग आणण्याचा प्रस्ताव होता. मात्र मंत्रिमंडळातील काही नेत्यांनी ३ सदस्यीय प्रभागाची भूमिका मांडली. त्यानंतर चर्चेअंती मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी महानगरपालिकांसाठी ३ सदस्यीय प्रभाग योग्य असल्याचा निर्णय घेतला. आजच्या निर्णयानुसार नगरपरिषद आणि नगरपालिकेत २ सदस्यीय प्रभाग पद्धत आणि नगरपंचायतीत १ सदस्यीय प्रभाग पद्धत ठेवण्यात आली आहे. यामुळे त्या भागातील नागरिकांना नागरी सुविधा देणे अत्यंत सोयीचे होईल अशी कल्पना आहे. याबाबत माहिती देताना राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की महाविकास आघाडीने हा निर्णय एकमताने घेतला आहे.

राज्यातील पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर अशा महत्वाच्या महानगरपालिकांमध्ये द्वीसदस्यीय प्रभाग पद्धत असावी असा काही नेत्यांचा आग्रह होता. गेल्या अनेक दिवसांपासून या संदर्भात विचार सुरू होता. याचे संकेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही काही दिवसांपूर्वी दिले होते. राज्यातील सर्वच महानगरपालिकांमध्ये एक सदस्यीय प्रभाग पद्धत नसेल, असे पवार यांनी म्हटले होते.

दरम्यान, मुंबईसह पुणे पिंपरी-चिंचवड, ठाणे, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, पनवेल, मिरा-भाईंदर, सोलापूर, नाशिक, मालेगाव, परभणी, नांदेड-वाघाळा, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर या महानगरपालिकांच्या निवडणुका पुढील वर्षी होत आहेत.



**रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांची जयंती संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनियर कॉलेजमध्ये साजरी झाली. यावेळी संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कर्मवीर अण्णांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कुल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल सीबीएसई बोर्डच्या प्राचार्या अर्चना चव्हाण, पीआरओ बाळासाहेब कारंडे.**

## संक्षिप्त...

### लवकरच सुरू होणार लहान मुलांचे लसीकरण



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशात कोरोनाविरुद्ध लसीकरण मोहीम वेगाने सुरू आहे. या मोहिमेमध्ये, वृद्ध आणि ४५ वर्षांवरील लोकांनंतर, १८ वर्षे वय ओलांडलेल्या सर्व लोकांचे लसीकरण केले जात आहे. पण, अद्याप किशोरवयीन आणि १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांच्या लसीकरणाची परवानगी देण्यात आलेली नाही. पण, आता लवकरच लहान मुलांनाही कोरोना लस मिळण्याची शक्यता आहे.

लहान मुलांच्या कोविड लसीकरणाबाबत, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद मध्ये कोविड-१९ साठी राष्ट्रीय टास्क फोर्सच्या ऑपरेशनल रिसर्च ग्रुपचे डॉ. एन के अरोरा म्हणतात की, देशात एकूण ४४ कोटी मुले आहेत. त्यापैकी १२ वर्षाखालील मुलांची संख्या सर्वाधिक आहे. त्याचबरोबर १२ ते १७ वयोगटातील एकूण १२ कोटी मुले आहेत. सध्या झायकोव्ह डी लसीला या वयोगटातील मुलांना लसीकरणासाठी भारतात मान्यता देण्यात आली आहे. ऑक्टोबर महिन्यात किशोरवयीन मुलांना लस मिळण्याची शक्यता आहे.

## चिरनेरची बँक ऑफ महाराष्ट्र बँक व्हीसट ॲन्टीना काढल्याने पडली आजारी

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : उरण तालुक्यातील चिरनेर येथील बँक ऑफ महाराष्ट्र बँकेने नेटवर्कसाठी बसविलेला व्हीसट ॲन्टींना बँकेला जागा देणाऱ्या मालकाने काही कामा निमित्ताने काढल्याने नेटवर्कची मोठी समस्या निर्माण झाली असून ऐन गणपतीच्या सणासुदीत म्हणजे गेल्या ३० ऑगस्ट २०२१ पासून ते आज पर्यंत बँकेचे सर्व ऑनलाईन व्यवहार बंद झाले आहेत. अलिकडे बँकेचे व्यवहार इंटरनेटच्या माध्यमातून होत आहेत. त्यामुळे ग्राहकांची तसेच बँक कर्मचाऱ्यांची सोय होत असते. परंतु नेटवर्क अभावी बँकेचे सर्व महत्त्वपूर्ण व्यवहार थांबले असून बँक ग्राहकांना पैशाची देवाण-घेवाण करण्यास मोठा अडथळा निर्माण झाला असून बँक ग्राहक बँकेच्या गलथान कारभारामुळे संताप व्यक्त करीत आहेत.

तर बँक कर्मचाऱ्यांना ग्राहकांना दररोज नवीन कोणते समाधानकारक उत्तर द्यायचे हादेखील बँक कर्मचाऱ्यांच्या पुढे मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे एकंदरीत जोपर्यंत बँक भाडे मालक नेटवर्क साठी बसविलेला व्हीसट अन्टीना योग्य जागेवर बसवत नाही तोपर्यंत बँकेचे कामकाज सुरू होणार नाहीत असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे त्यामुळे बँक ग्राहक व बँक कर्मचारी वैतागले आहेत चिरनेर परिसरात एटीएमची सुविधा व बँकेची सेवा खूप कमी प्रमाणात आहे.

येथे अन्य बँक शाखा उपलब्ध नसल्यामुळे हजारो नागरिकांची बँक खाती चिरनेर शाखेच्या बँक ऑफ महाराष्ट्र बँकेत आहेत त्यामुळे नागरिकांना बँक ऑफ महाराष्ट्र आणि तिथे असलेल्या .../२

## गणेशोत्सवानिमित्त कोकणात गेलेल्या २७२ जणांना कोरोनाची लागण

**दै.रायगड नगरी । धम्मशील सावंत**

**पाली/बेणसे** : कोकणात लोकप्रिय मानल्या जाणाऱ्या गणेशोत्सवानिमित्त मुंबई, ठाणे, पालघर व अन्य भागांतून कोकणात गेलेल्या गणेशभक्तांपैकी २७२ जणांना करोनाची लागण झाल्याची माहिती रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालयांकडून देण्यात आली. त्यांच्यावर रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. यंदा गणेशोत्सवानिमित्त जवळपास दोन लाख १७ हजारांहून अधिक गणेशभक्त कोकणात दाखल झाले होते. त्या तुलनेत करोनाबाधितांचे प्रमाण कमी असल्याचे सांगण्यात आले.

गणेशोत्सवानिमित्त रत्नागिरी जिल्ह्यात आलेल्या १ लाख ३० हजार जणांपैकी ९० हजार जण करोना चाचणी करून आणि दोन



लसमात्रा घेऊन आलेले होते. ४० हजार जण चाचणीसाठी पात्र होते; परंतु त्यातील साधारण २० हजार जण १८ वर्षांखालील होते, अशी माहिती रत्नागिरी जिल्हाधिकारी डॉ. बी.एन. पाटील यांनी दिली. उर्वरित २० हजार जणांपैकी १२० जणांना करोनाची लागण झाल्याचे चाचणीत आढळून आले. त्याव्यतिरिक्त ७२ जणांना करोनासदृश लक्षणे होती. त्यांच्यावर घरीच उपचार सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.

### वेळ पडल्यास सिडकोची सर्व काम बंद पाडून रस्त्यावर उतरू

# कोल्ही कोपर गावाची सिडकोकडून ससेहोलपट; सिडकोने भूमीपुत्रांची केली घोर फसवणूक

### पत्रकार परिषदेत कोल्ही-कोपर भूमीपुत्रांचा एल्गार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सिडकोच्या आमिषाला बळी पडून आपली पिकती सुपीक जमीन व सुस्थितीत असलेली घरेदारे सिडकोला तुटपुंज्या दरात बहाल केल्यानंतर सिडकोने योजना दाखवून ग्रामस्थांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. साडे बावीस टक्के जमीन देण्याच्या नावाखाली प्रत्यक्ष साडे बारा टक्केच जमीन देऊन दहा टक्के मोबदला देण्याचे ठरविण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात साडे बारा टक्के जमीन मिळण्याऐवजी पावणे आठ टक्केच जमीन भूमीपुत्रांच्या वाट्याला आली असून सिडकोने भूमीपुत्रांची घोर फसवणूक केली आहे. या संदर्भात आज (बुधवार दि.२२) कोल्ही-कोपर येथील लक्ष्मी नारायण मंदिरात भूमीपुत्रांनी पत्रकार परिषद घेऊन आपल्या झालेल्या फसवणुकीचा पाडा वाचला. या पत्रकार परिषदेला पंचकमिटीचे मोहन नाईक, धनराज भोईर, सरपंच अहिल्या बाळाराम नाईक, मनखुश नाईक, जनार्दन करावकर, बाळाराम नाईक, महेंद्र नाईक, राहुल नाईक, तान्हाजी भोईर, हृषीकेश भोईर, गंगाराम नाईक, कृष्णा नाईक, प्रल्हाद नाईक, बबन घरत, राम पाटील, कृष्णा भोईर, अमृत भोईर, मधुकर भोईर, प्रभाकर नाईक, हरिभाऊ नाईक, काशिनाथ भोईर, रोहिदास पाटील, शंकर डोंगरे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी येथील गाव कमिटीने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सिडकोच्या गलथान कारभाराचा तीव्र निषेध व्यक्त केला. यासंदर्भात सिडको विरोधात न्यायालयीन लढाई लढण्याचा एल्गारही यावेळी करण्यात आला. येथील प्रकल्पबाधित गाव कमिटीने सांगितले की, आमची घरे उठविल्यानंतर आम्हाला अठरा महिन्यांचे घरभाडे देण्याचे सिडकोने मान्य केले होते. मात्र प्रत्यक्षात बारा महिन्यांचे घरभाडे देण्यात आले असून आज साडेचार वर्षे उलटूनही अनेक प्रकल्पग्रस्त नागरिक भाड्याच्या घरातच राहत आहेत. यासंदर्भात सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सुद्धा व पत्रव्यवहार करून सुद्धा सिडको आम्हा भूमीपुत्रांना वेळोवेळी डावलण्याचा प्रयत्न करीत असल्याचे उपस्थित भूमीपुत्रांनी सांगितले.

सिडकोकडे गावासाठी मैदान उपलब्ध करून देण्यासाठी मागणी केली असता, त्या मागणीला सुद्धा वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या असून मैदानासाठी राखीव असलेला भूखंड एका शिक्षण संस्थेला देण्यात आलेला आहे. तसेच सिडकोने अनेक नागरी सोयी सुविधा देण्यासंदर्भात आम्हाला आश्वासने दिली होती, परंतु त्याची सुद्धा आजमितीस पूर्तता झाली नाही. आमचे कोल्ही-कोपर हे गाव नवी मुंबई विमानतळासाठी विस्थापित झाल्याने आम्हाला वडघर, करंजाडे, पुष्पकनगर नोड येथे जागा देण्यात आली आहे. त्यामुळे आमच्या गावचे नावच नकाशावरून पुसले गेले आहे. त्यामुळे आमच्या गावाची ओळख कायम राहण्यासाठी या विभागाला गावाची मूळ नावे देण्यात यावीत. अशी आग्रही मागणीही पत्रकार परिषदेत करण्यात आली.

देवस्थानच्या भूखंडाच्या .../२

## वाढीव 20% अनुदान बंद केलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन सुरु करण्याचे शासन आदेश

### शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांच्या प्रयत्नाला यश

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

वाढीव २० टक्के अनुदानासाठी अपात्र ठरलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळाच्या तुकड्यावरील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे २० टक्के नुसार बंद ठेवण्यात आलेले वेतन पूर्ववत सुरू करणे बाबत आदेश आज शासनाकडून निर्गमित करण्यात आले.



या साठी कोकण विभाग शिक्षक आमदार बाळाराम पाटील आणि माजी आ. श्रीकांत देशपांडे यांनी यशस्वी पाठपुरावा केला.दिनांक १२ व १५ फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयानुसार, २० टक्के अनुदान सुरू असलेल्या तथापि वाढीव २० टक्के अनुदानाकरिता ज्या शाळा अपात्र ठरल्या होत्या, अशा शाळांतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पूर्वी पासून सुरू असलेले २० टक्के अनुदान बंद करण्यात आले होते. शासनाचे कोणतेही निर्देश नसताना ही संबंधित शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन बंद करण्यात आले होते.सदर प्रश्नाबाबत कोकण विभाग शिक्षक आमदार बाळाराम पाटील आणि माजी आ. श्रीकांत .../२

## जयवंत पाटील यांचा सिडको प्रशासनाला आंदोलनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । उरण**

सिडको प्रशासनाने स्थानिक बेरोजगार प्रकल्पग्रस्तांवर केलेल्या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी व सिडको संबंधित वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तसेच विविध मागण्यासाठी बोकडवीरा गावचे रहिवासी तथा स्थानिक सिडको प्रकल्पग्रस्त जयवंत हिराजी पाटील यांनी सिडको प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस आयुक्तालय नवी मुंबई, तहसिलदार उरण, गटविकास अधिकारी पंचायत समिती उरण, विशेष भूसंपादन अधिकारी मेट्रो सेंटर उरण, आयुक्त कोकण विभाग, उरण पोलीस ठाणे येथे पत्रव्यवहार करून उरण पोलीस ठाणे येथे दि. ४ ऑक्टोबर २०२१ पासून बेमुदत साखळी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

सिडकोने विविध समस्या वर्षानुवर्षे .../२

## १ ते १९ वयोगटातील बालकांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२१ सप्टेबर २०२१ रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिनाचे औचित्य साधून एकात्मिक बाल विकास प्रकल्प व पनवेल महानगर पालिका आरोग्य विभाग यांच्यामार्फत वय वर्षे १ ते १९ वयोगटातील बालकांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात आले. पनवेल महानगरपालिकेच्या प्र. क्र.१८ मधील वाल्मिकी नगर येथील कार्यक्रमास नगरसेविका डॉ सुरेखा मोहोकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी मुलांना जंतनाशक गोळ्या दिल्या तसेच जंतनाशक गोळ्यांचे सेवन करण्याचे महत्त्व सांगितले.या उपक्रमास डॉ मोहोकर यांच्या समवेत डॉ.अंजली घरत व आशा सेविका, परिचारिका उपस्थित होत्या.

जंत अर्थात कृमी नाशक दिन आजच्या दिनी पूर्ण देशात साजरा केला जातो. लहान मुलांच्या वाढीत बाधा टाकण्याचे काम कृमी करत असतात. बऱ्याच वेळेस जंतांमुळे .../२



# संक्षिप्त...

## आगरदांडा एस.टी.सुरु करावी : नागरिक व प्रवासी वर्गाची मागणी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या अनेक दिवसांपासून बंद करण्यात आलेली मुरुड आगाराची मुरुड-आगरदांडा सुरू करण्यात यावी.अशी मागणी नागरिक व प्रवासीवर्गातून जोर धरीत आहे.

श्रीवर्धन, म्हसळा व मुरुड असा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आगरदांडा ते दिघी जलमार्ग सोयिस्कर असून या मार्गावर गेल्या अनेक दिवसांपासून बंद आगरदांडा बस सेवा बंद असल्याने आगरदांडा जेटीवर जाण्यासाठी एक मैल पायपीट करावी लागत असून त्रास सहन करावा लागत आहे.

मुरुड आगार प्रमुख यांनी प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन आगरदांडा एस टी सेवा सुरू करण्यात यावी. अशी मागणी नागरिक व प्रवासीवर्गातून जोर धरीत आहे.

## सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठान तर्फे कोलाड हायस्कूलला विविध वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष आ. अनिकेतभाई तटकरे यांच्या संकल्पनेतून सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या द.ग तटकरे माध्यमिक विद्यालय कोलाड या विद्यालयाला विद्यार्थ्यांसाठी मास्क, सेनिटायझर, हँडग्लोज आदी वस्तू सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठानतर्फे देण्यात आल्या. सोमवार पासून काही वर्ग सुरु झालेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सदरी वस्तू देण्यात आल्या. सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठानचे कार्यकर्ते राकेश शिंदे यांच्याकडे वरील वस्तूंची मागणी करण्यात आली होती. राकेश शिंदे यांनी खासदार सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्वरित वस्तूंचे वाटप केले. द.ग तटकरे माध्यमिक विद्यालय कोलाडचे मुख्याध्यापक श्री शिरीष येरूणकर यांच्याकडे वरील वस्तूंचे कीट देण्यात आले. यावेळी श्रीकांत चव्हाण, महेंद्र वाचकवडे, गणेश वाचकवडे, शैलेश सानप, अविनाश पलंगे, समीर शिंदे, आकाश भिंगारे, कमलेश कदम, रोहित शिंदे, त्याचप्रमाणे कोलाड हायस्कूलचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सोमवारपासून माध्यमिक हायस्कूलचे काही वर्ग सुरू केले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सदरील साहित्य सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठान च्या माध्यमातून दिल्या बद्दल घोणे सरांनी विद्यालयातर्फे आभार मानले तसेच पालकांनीही धन्यवाद दिले.



# राकेश कोकळेंच्या मागणीला यश : स्व. हेमंत बिरामणे यांच्या नावाच्या नाक्याचे अनावरण

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : आपला जीवलग आणि अश्वपाल संघटनेचे आधारवड असलेला, सर्वांशी अदबीने वागणारा गरजवंतांच्या नेहमीच मदतीसाठी धावणारा, दानशूर व्यक्तिमत्त्व असलेला मित्र हेमंत बिरामणे यांचे २२ सप्टेंबर २०२० मध्ये कोरोना मुळे निधन झाले होते. त्यामुळे त्यांच्या आठवणी कायम स्मरणात राहाव्यात त्यांच्या जाण्याची उणीव भासू नये याकामी हेमंत बिरामणे यांच्या नावाचा नाका शहराच्या मध्यवर्ती भागात असावा यासाठी धनगर समाजाचे अध्यक्ष अश्वपालक राकेश कोकळे यांनी अश्वपाल मित्र परिवार यांच्या वतीने ३० सप्टेंबर २०२० रोजी नगरपरिषदेच्या कार्यालयात निवेदन सादर केले होते. याची दखल घेत आज दि.२२ रोजी महात्मा गांधी मार्गावर स्व.हेमंत सहदेव बिरामणे यांच्या नावाने हेमंत नाक्याचे अनावरण नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी मुख्याधिकारी सुरेखा भणगे (शिंदे), नगरपालिका गटनेते प्रसाद सावंत, उप नगराध्यक्ष आकाश चौधरी, शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी, माजी नगरसेवक प्रकाश सुतार, प्रदीप घावरे, धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे, श्रमिक हातरीक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदे,भाजप अध्यक्ष प्रवीण सकपाळ, माजी अध्यक्ष विलास पाटील, किरण चौधरी, वसंत कदम, गजानन अबनावे, नगरसेवक चंद्रकांत जाधव, करन जानकर यांसह भाजपचे सर्व नगरसेवक, नगरसेविका त्याचप्रमाणे अन्य पक्षाचे सदस्य, नागरीक, हेमंत बिरामणे यांचे नातेवाईक तसेच अश्वपालक मोठया संख्येने उपस्थित होते. या छोटेखानी कार्यक्रमावर वरूण राजाने सुध्दा अभिषेक घातला होता भर पावसात सुध्दा केवळ हेमंत बिरामणे यांच्या प्रेमाखातर जनसमुदायाने हजेरी लावली होती. प्रथम स्मृतिदिनानिमित्त हेमंत बिरामणे मित्र परिवार आणि झुणझुणवाला शंकरा आय फाउंडेशन नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन एका हॉटेलमध्ये करण्यात आले होते. डॉ. गिरीश बुधराणी, डॉ. राजेश कापसे, डॉ. सचिन भूमकर, चित्रा आणि टीमने योग्यप्रकारे रुग्णांची तपासणी केली. यावेळी अनेक गरजूंनी या सुवर्ण संधीचा लाभ घेतला. आपल्या मित्राबद्दल अनेकांनी जुन्या आठवणींना उजाळा देत हेमंत बिरामणे यांच्या विषयी असलेल्या भावना व्यक्त केल्या अनेकांना यावेळी आपले अश्रू अनावर झाले होते. महात्मा गांधी मार्गावर हेमंत नाका उभारण्यात आला आहे. या भागाचे सुशोभीकरण आणि स्वच्छता राखली गेली पाहिजे याच मुख्य रस्त्यावर घोड्यांना बांधलेले असते. त्यामुळे पादचाऱ्यांना पायी चालत जाणे म्हणजे एकप्रकारे तारेवरची कसरत असते ह्या रस्त्याला जे काही घोड्यांच्या तबेल्याचे स्वरूप आले आहे.

त्यामुळे या भागात मोठया प्रमाणावर घोड्यांच्या मलमूत्राने दुर्गंधीचा सामना पर्यटकांना, नागरिकांना आणि आजूबाजूच्या व्यापारी वर्गाला सहन करावा लागत आहे. हेमंत बिरामणे यांच्या नावाच्या नाक्याचे अनावरण करण्यात आल्यामुळे निदान यापुढे तरी हा संपूर्ण भाग दुर्गंधी मुक्त आणि स्वच्छ असावा, या ठिकाणापासून रेल्वे स्टेशन पर्यंत नगरपरिषदेच्या माध्यमातून पर्यटकांना विश्रांती साठी बाकडे बसविण्यात आल्यास हा भाग नक्कीच सुशोभित आणि स्वच्छ राहील असे स्थानिक व्यापारी वर्गासह नागरिकांचे म्हणणे आहे.

## तळोजा परिसरातून महिला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**


तळोजा परिसरातील मच्छी कंपनीतून आपल्या राहत्या घरी पेण जाण्यासाठी निघाली असलेली एक महिला अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

सौ.प्रभावती गजानन पाटील वय ४५ वर्षे, रंग गोरा, उंची ५ फूट, भांगेवर केस पांढरे, बांधा मध्यम, गळ्यात काळे मंगळसूत्र, अंगात नेसून रंगीबेरंगी चौकड्यांची साडी आकाशी रंगाचा ब्लाउज, खांद्यावर काळ्या रंगाची हॅन्डबॅग असे या महिलेचे नाव व वर्णन आहे. हि महिला तळोजा येथील फॉर स्टार मच्छी कंपनी तळोजा येथून आपल्या राहत्या घरी पेण येथे परतलीच नसल्याने गजानन पाटील यांनी तळोजा पोलीस ठाणे गाठत हरविल्याची तक्रार दिली आहे. त्यानुसार पोलीस तक्रार दाखल करून त्या महिलेचा शोध सुरु केला आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे ०२२२७४१२३३३ पोलीस नाईक अर्जुन पवार यांच्याशी संपर्क साधा असे आवाहन करण्यात आले आहे.

## विक्रांत पाटील यांनी करून घेतली प्रभागात साफसफाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वच्छ भारत सर्वेक्षणांमध्ये पनवेल शहर एक कचराकुंडी मुक्त शहर असेल यासाठी सर्वजण प्रयत्न करत आहते. नगरसेवक विक्रांत पाटील यांनी आपला प्रभाग सुंदर व स्वच्छ प्रभाग असावा यासाठी महापालिका आरोग्य विभाग सोबत जोरदार प्रयत्न चालू केले आहेत. प्रभागातील हॉटस्पॉट ठरत असलेली ठिकाणे-आशियाना कॉर्नर, विरुपाक्ष हॉल, नवीन कोर्ट आणि शांताबाई गाडगे मार्ग येथे स्वछता मोहीम हाती घेण्यात आली. हे सर्व हॉटस्पॉट ची सफाई करून घेण्यात आली व नागरिकांना या जागी कचरा टाकू नये असे आव्हान नगरसेवक विक्रांत



पाटील यांच्या वतीने करण्यात आले.

जमा झालेले ओला आणि सुखा कचरा वेग वेगळा करून घंटागाडी मध्ये टाकावा अशी विनंती येथील नागरिकांना करण्यात आली. नागरिकांनी सुद्धा या उपक्रमाला त्यांचा सहभाग राहील असें सांगितले. आपल्या पनवेल शहराला स्वच्छ पनवेल, सुंदर पनवेल व कचराकुंडी मुक्त शहर करण्याकरीता नागरिकांनी सहकार्य करावे व ओला, सुखा कचरा आणि जैविक कचरा हे तिन्ही वेगळे करून ठेवायची सवय सर्व पनवेलकरांनी अंगीकृत करून घ्यावी जेणेकरून स्वच्छ भारत सर्वेक्षणा मध्ये आपले शहर मानांकित होईल असे आव्हान नगरसेवक विक्रांत पाटील यांनी केले. विक्रांत पाटील हे नेहमी नवं-नवीन उपक्रम प्रभागा मध्ये राबवत असतात याबद्दल नागरिकांना समाधान व्यक्त केले आहे.

## तालुका पत्रकार सेवा संघटनेच्या सभेत अरुणोदय पुस्तकाचे पुन:प्रकाशन

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुका पत्रकार सेवा संघाची मासिक सभा सोमवार दि. २० सप्टेंबर रोजी सर्व सदस्यांचे उपस्थितीत संपन्न झाली.

रायगड भुषण जेष्ठ पत्रकार अरुण पवार यांनी माणगांव मधिल विविध सामाजिक विषयांवर आपल्या लेखनीतून बातम्यां द्वारे न्याय देण्याचा प्रयत्न केला व अनेक वर्षाच्या पत्रकारितेची कायम आठवण राहावी यासाठी पत्नीचे खास आग्रहास्तव आपल्या संग्रहित बातम्यांचे 'अरुणोदय' हे पुस्तक छापले.



या पुस्तकापासुन प्रेरणा घेऊन नवोदित पत्रकारांना शिकता यावे या उद्देशाने माणगांव तालुका पत्रकार सेवा संघ अध्यक्ष रविंद्र कुवेसकर यांनी आपल्या संघटनेच्या माध्यमातून या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे पुनःप्रकाशन करण्याचा मानस व्यक्त केला. सोमवार दि. २० सप्टेंबर रोजी सर्व सदस्यांच्या उपस्थितीत रायगड भुषण जेष्ठ पत्रकार, आपत्ती व्यवस्थापन तज्ञ, लेखक, कवि प्राध्या. जयपाल पाटील यांच्या हस्ते त्याचे प्रकाशन

याप्रसंगी संघटनेच्या विविध विषयांवर चर्चा देखिल करण्यात आली असुन पत्रकारांसाठी लवकरच एक आरोग्य शिबीर तसेच शेती विषयक अभ्यास दौरा आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आला. याविषयी जयपाल पाटील यांनी आपल्या पत्रकारांनी नावलौकीक करावा तसेच अरुण पवार यांचे या पुस्तकाची शासनाचे साहित्य विभागाने नोंद घ्यावी याबाबत अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या सभेत माणगांवकरांना भेडसावणाऱ्या समस्यांचा पाठपूरावा करण्याचा संकल्प देखिल करण्यात आला.

### जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका खालापूर पैकी गाव वडवळ येथील खालील वर्णनाची मिळकत पवनकुमार बजाज व पी.चंद्रंसेखरा रेड्डी यांचे सह मालकीचे असून सदर मिळकत विकत घेण्याबाबत मिळकतीचे सहमालकांबरोबर आमचे अशिलांनी बोलणी केली असून, प्राथमिक करार केला आहे.

| अनुक्रमांक | गट नंबर / हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १ | ७२ अ/१/अ/५१ | ०-२९-१० | ०-०० |
| २ | ७२ अ/१/अ/५२ | ०-२७-३० | ०-०० |

तरी सदर मिळकतीचा सातबारा उताऱ्यावर नाव असणाऱ्या सहमालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध या मिळकतीमध्ये असल्यास आणि वर नमूद केलेल्या जमिनीच्या प्रस्तावित व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसांचे आत नोंदवावी. त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि.२३/०९/२०२१

**सही/-**
**ॲड.श्रीराम प्रमोद ठोसर**
**बी-४, लक्ष्मी व्हिला सोसायटी**
**ब्राह्मण आळी, अलिबाग,**
**अलिबाग-रायगड**
**मो.नं.९८२३२७९०४६**

---

अर्जदारातर्फे वकील : ॲड.विजयेंद्र ना. मुंढे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश, रायगड पनवेल यांचे कोर्टात
अर्ज नं.७०/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०४/१०/२०२१

श्रीमती.अरुणा नारायण ढुमणा
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.मु.चिंचवली, पो.कुळगाव, ता.व जि.पुणे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

याद्वारे जाहीर करण्यात येते की, पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयातील दिवाणी चौकशी अर्ज नं.७०/२०२१ नुसार अर्जदार यांस कु.सोमनाथ नारायण ढुमणा, कु.कुंडलिका नारायण ढुमणा आणि कु.दिपाली नारायण ढुमणा यांच्या हिश्याची अथवा त्याला मिळणाऱ्या हिश्याच्या मौजे : मालडुंगे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील सर्व्हे नं.८२, हिस्सा नं.४/अ/१, क्षेत्र ०-५७-६०, पो.ख. ०-२२-४०, आकार ०.९४ ही मिळकत विक्री करणेकरिता, सदर मिळकतीचे त्याचे वर्णन खरेदीखत, करारावर सही करण्याकरिता तसेच सदरचे करार नोंदणीकृत करण्याकरिता, सदर मिळकतीच्या विक्रीतून मिळणारी मोबदल्यात रक्कम स्वीकारण्याकरिता अर्ज केलेला आहे. कै.नारायण पदू ढुमणा हे दि.१९/०५/२०१४ रोजी मयत झालेले आहेत.

अर्जदार श्रीमती.अरुणा नारायण ढुमणा यांचे व्यतिरिक्त कु.सोमनाथ नारायण ढुमणा, कु.कुंडलिक नारायण ढुमणा आणि कु.दिपाली नारायण ढुमणा यांचे अज्ञान पालनकर्ती जनक माता म्हणून कोणाचेही हरकत, हक्क अधिकार किंवा हितसंबंध असतील तर त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत आपला हक्क हितसंबंधाबाबत योग्य तो कायदेशीर पुरावा घेवून किंवा दिनांक ४/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर रहावे अन्यथा कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन मे.कोर्ट पुढील कारवाई करेल. सदर नोटीस आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **अतिरिक्त जि.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **अतिरिक्त जि.न्याया, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही श्री.जगन्नाथ गणा उर्फ गणू पाटील यांचे नांवे महसूल दप्तरी ७/१२ सदरी आहे. सदरी क्षेत्र ०-०२-० हे.आर.पॉ. आकार ०-३२ आहे. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : सांगडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| जगन्नाथ गणा पाटील यांचे मालकीचे क्षेत्र | ८६/१ | ०-०८-१० यापैकी ०-०२-० | ०-३२ |
| मौजे सांगडे, ता.पनवेल येथील नमुना नंबर ८ असेसमेंट लिस्ट फॉर्मवरील मालमत्ता क्र.२२२, भोगवटादाराचे नाव जगन्नाथ गणा पाटील आर.सी.सी.घर, क्षेत्र ७५.२५ चौ.मी. | | | |

मौजे : सांगडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार श्री.जगन्नाथ गणा पाटील यांची वरील नमूद केलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेली कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दि.२१/०९/२०२१**

**सही/-**
**मयुरेश प्र.हनुमंते**
**ॲडव्होकेट-हायकोर्ट**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग,**
**ठाणा नाका, रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

---

श्री.राव साहेब कोर्ट
वादीतर्फे वकील ॲड.चंद्रकांत देशमुख

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांच्या न्यायालयात
स्पे.द.क्र.१०७/२०१९
नि.नं.१०/ड
ने.ता.१८/११/२०२१

श्री.राजकुमार चंद्रसेन चव्हाण — दरखास्तदार
विरुद्ध
एम.एस.के.मापारा व इतर — प्रतिवादी

प्रति,
प्रतिवादी क्रं.१
श्री.एम.एस.के.मापारा प्रोप्रायटर पायोनिर डेव्हलपर्स
ऑफिस पत्ता : फातेमा मंजिल, प्लॉट नं.३७ अे,
सेक्टर ५, न्यू पनवेल, पनवेल, जि.रायगड

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्या विरुद्ध सोबतच्या नक्कलेप्रमाणे या न्यायालयात दावा दाखल केला आहे. म्हणून सदर दाव्याच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्यासाठी दि.१८/११/२०२१ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा ज्यास यांच्या योग्य सूचना दिलेल्या असून जे वादासंबंधीच्या सर्व महत्वाची प्रश्नांची उत्तरे देवू शकणारी व्यक्ती त्यांच्या बरोबर असेल अशा वकीलांमार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलाविण्यात येत आहे व तुमच्या हजेरीसाठी ठरलेल्या दिवशी वादाच्या अंतिम निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे बचावाच्या पुष्ठार्थ तुम्ही साक्षीदाराच्या साक्षीच्या व ज्या दस्तऐवजाचा आधार घेवू इच्छितो ते सर्व साक्षीदार व सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुम्हाला तयारी ठेवावी लागेल.

तुम्हाला नोटीस देण्यात येते आहे की, उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी होवून निर्णय दिला जाईल याची दखल घ्यावी.

तसेच तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास तुमचा जबाब रद्द होण्यास पात्र ठरेल.

आज दि.२१/०९/२०२१ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

(कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे मॅडम
ॲड.सुनील एन. मोरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर/क.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२३१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२९/१०/२०२१

१) श्रीमती.सिताबाई मारुती उर्फ संपत रौंधळ
वय : ७० वर्षे, व्यवसाय : काहीही नाही
२) श्री.बाळासाहेब संपत रौंधळ
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : शेती
दोघेही रा.मु.रौंधळवाडी, पो.कोहिंदे,
ता.खेड (राजगुरुनगर), जि.पुणे-४१२४०४
३) श्री.काशिनाथ संपत रौंधळ
वय : ४० वर्षे, व्यवसाय : नोकरी
४) श्री.भाऊसाहेब संपत रौंधळ
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
दोघेही रा.रुम नं.२५, प्लॉट नं.बी-२,
समाधान को.ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेड
सेक्टर १४, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ हिचे पती, अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.मारुती उर्फ संपत मल्हारी रौंधळ यांच्या नावाने पनवेल महानगरपालिकेकडे नोंदीत आहे. अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.मारुती उर्फ संपत मल्हारी रौंधळ हे दि.२५/०५/२०२१ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ हिची सासू व अर्जदार नं.२ ते ४ यांची आजी कै.गजराबाई मल्हारी रौंधळ या दि.३०/११/१९८५ मु.रौंधळवाडी, पो.कोहिंदे, ता.खेड, जि.पुणे येथे राहत्या घरी मयत झालेल्या असून त्यांच्या मृत्यूची नोंद सरकारी कार्यालयात केलेली नाही. कै.मारुती उर्फ संपत मल्हारी रौंधळ यांच्या नावाने सिडको कार्यक्षेत्रात खालील वर्णनाची मिळकत सिडकोकडे नोंदीत आहे. सदर मिळकती संदर्भात वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पालेखुर्द, ता.पनवेल, जि.रायगड येथील**
**पनवेल महानगरपालिका हद्दीतील घर नं.४८५ ब,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.२२/०९/२०२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.श्रीमती गोडसे सो
अर्जदारांतर्फे वकील
ॲड.प्रशांत म. भोईर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२४२/२०२१
नि.नं.११/ड
ने.ता.२५/१०/२०२१

१) श्री.लक्ष्मण मऱ्या कोळी
२) श्री.देवेंद्र लक्ष्मण कोळी
दोघे रा.मु.कोंबडभुजे, पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. लक्ष्मी लक्ष्मण कोळी ह्या दि.२९/०८/२०१८ रोजी मु.कोंबडभुजे, पो. उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून अर्जदार क्र.१ हे कै. लक्ष्मी लक्ष्मण कोळी यांचे पती असून अर्जदार क्र.२ त्यांचा मुलगा असून कायदेशीर वारसदार आहेत. त्यांचे नावे असलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.नं. | गावाचे नाव | युनिट केस क्र. | सर्वेक्षण क्र. | घर क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | गणेशपुरी | GAN-ICOGD-128 | GP-255 | ७८० | ८५.५६ चौ.मी. |

वरील घर मिळकतीचे संपादनाचे मोबदल्यात सिडकोने खालीलप्रमाणे भूखंडाचे वाटप केलेले आहे.

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक (उलवे) | २५ A | २१४ A | २६० चौ.मी. |

येणेप्रमाणे घर मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै.लक्ष्मी लक्ष्मण कोळी यांस संपादीत जमिनीचे मोबदल्यात पुनःर्वसन व पुनःस्थापना योजनेंतर्गत विकसित भूखंड मिळणार आहेत. सदर भूखंड त्यांच्या पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार क्र.१ व २ यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१७/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## तेरा वर्षीय मुलीचे अपहरण, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील एका गावामध्ये १३ वर्षीय मुलीचे अपहरण केल्याची घटना घडली आहे. अल्पवयीन मुलगी घरातील काम न करता खेळत राहते असे तिला तिची आई ओरडली. त्यामुळे चाचीच्या घरी जाते असे सांगून ती घरातून बाहेर गेली. यावेळी अज्ञात इसमाने तिचे अपहरण केले. अपहरणाचा गुन्हा पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. या मुलीची उंची तीन फूट, पाच इंच, रंग गव्हाळ, चेहरा गोल आहे. तिचे नाक सरळ, बांधा पातळ असून डोक्यावर काळ्या व राखाडी रंगाचा स्कार्फ आहे. काळ्या रंगाचा कुडता, निळ्या रंगाची लेगीज घातलेली आहे. तिला हिंदी व उर्दू भाषा बोलता येते.

## सुरेश करडे यांचे वृद्धापकाळाने निधन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा शहर हिंदू समाजाचे संस्थापक अध्यक्ष सुरेश काशिनाथ उर्फ बाबा करडे यांचे मंगळवार दि.२१सप्टेंबर रोजी सायं.७ वा. वयाचे ८१ व्या वर्षी वृद्धापकाळाने राहत्या घरी निधन झाले.त्यानी अनेक वर्ष हिंदू समाजाचे अध्यक्ष पद भूषविले. त्यांच्या पश्चात पत्नी लिलावती वहिनी, योगेश व यतीन हे व्यवसायीक मुलगे,दोन मुली, सूना,जावई नातवंडे असा फार मोठा परिवार आहे.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# बलात्कार झाल्याचा आरोप करणारी महिलाच निघाली आरोपी ; खालापूर पोलिसांचा भांडाफोड

## पाच जणांच्या आवळल्या मुसक्या ; चार दिवस पोलीस कोठडी

**दै.रायगड नगरी । राज साळुंके**

**खोपोली** : माझ्यावर दोन जणांनी फसवून बलात्कार केला आहे म्हणून न्याय मागाला आलेली महिलाच आरोपी असल्याची धक्कादायक घटना खालापूर पोलीस ठाण्यात घडली असून या महिले सोबत असणाऱ्या पाच जणांच्या टोळीला खालपूर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत या रेप केस चा तपास पोलिसांनी करत खऱ्या गुन्हेगारांचा भांडाफोड करीत त्यांच्या मुसक्या आवळल्याने खालापूर पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

महिलांवरील अत्याचार हा विषय सध्या महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर गाजतो आहे. साकिनाका येथील महिलेवरील बलात्कार व खून या प्रकरणानंतर तर विरोधकांनी सरकारला अक्षरशः आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केल्याचे पहावयास मिळत आहे व महिला सुरक्षा या विषयावर दोन दिवसाचे विशेष अधिवेशन घ्यावे अशी सूचना दस्तुरखुद्द राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मुख्यमंत्र्याना केलेली आज सर्वांनी पाहिली. महिलांचा अत्याचाराबाबत विषय आला की पोलीस ही त्यावर संवेदनशीलता दाखवत तपास करतात तर याच गोष्टीचा फायदा काही महिला घेत समाजात फायदा उठवतात व महिलांच्या आडून काही गुन्हेगार आपली पोळी ही भाजतात.असाच काहीसा प्रकार खालापूर मध्ये घडला असून त्याचा भांडाफोड खालापूर पोलिसांनी केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार ५ जून २०२१ रोजी एक महिला खालापूर पोलिसठाण्यात आली व तिच्यावर दीड वर्षांपूर्वी म्हणजे फेब्रुवारी२०२० मध्ये दोन जणांनी बलात्कार केल्याची तक्रार तिने दिली.ती मुलाची राहणारी नाशिक च्या पंचवटी येथील तिला सोन्याचांदीच्या दुकानात नोकरीस लावतो म्हणून तिला दुकान दाखवतो असा बहाणा करून तिला इकडे आणले व खालापूर ते चौक च्या दरम्यान गाडीतून जात असताना अंधारात गाडी थांबवून बंदुकीचा धाक दाखवत तिच्यावर बलात्कार केला व तिचे नग्न फोटो काढून कोणाला बोललीस तर व्हायरल करू अशी धमकी दिली. अशी हकीकत तिने सांगून त्या दोन जणांची नावे तिने पोलिसांनी सांगितली. ती महिला असल्याने तिची फिर्याद नोंद करून खालापूर पोलीस तपासाला लागले. त्या महिलेने सांगितलेले आरोपी महालिंग जंगम व राजाराम गोगावले या दोघांना पोलिसांनी पुण्यातून अटक करून तपासासाठी खालापूर ला आणले तेव्हा त्यांनी पोलिसांना सांगितले की पुण्यातील दिलिप साहेबराव यादव याचे बरोबर त्यांचा व्यावसायिक व आर्थिक वाद झाला होता व त्यांच्याविरोधात पुणे पोलिसात तक्रार ही केली होती त्या अनुषंगाने दिलीप यादव ला अटक ही झाली होती त्याचा राग धरून त्यानेच आम्हाला फसवायाचे हे षडयंत्र रचले असावे व तक्रारदार महिलेस ते ओळखत ही नाही व कधी पाहिलेलेही नाही. त्यामुळे पोलिसांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली व त्या अनुषंगाने पोलिसांनी तपास सुरू केला.

सदरचा गुन्हा एक वर्ष तीन महिने आधी घडला असल्याने तसा ठोस पुरावा पोलिसांना मिळत नव्हता तेव्हा वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली अत्याधुनिक तंत्राचा वापर करीत गुन्ह्याचा तपास खालापूर पोलिसांनी सुरू केला व तांत्रिक बाबींच्या कड्या जुळवता जुळवता खरे सत्य पोलिसांच्या समोर येऊ लागले व असे निष्पन्न झाले की पुण्याचा दिलीप यादव व सुमित सापते कल्याणचा बंटी उर्फ श्रीकांत गोंधळ, आणि मुंबईच्या परेलचे प्राची पवार व वैभव वीरकर यांनी कट रचून या तक्रारदार मुलीच्या आर्थिक परिस्तितीचा फायदा घेत तिला पैशाचे अमिश देत महालिंग जंगम व राजाराम गोगावले यांच्या विरोधात खोटा गुन्हा दाखल करायला लावला होता. आणि तसा जबाब त्यामुलीने खालापूर पोलिसांना दिला आणि तसा क्लोजर रिपोर्ट खालापूर पोलीस कोर्टात सादर केला.

या पोलिसांच्या क्लोजर रिपोर्टची प्रत म्हणजे एकंदरीत खोटी फिर्याद दाखल केल्याची प्रत महालिंग जंगम ने कोर्टाकडून मिळवली व त्यानंतर दिलीप यादव याने त्याच्याकडून सोन्याचे दागिने बनवून घेतले व पैसे देण्यास टाळाटाळ केली व पैसे मागण्यास गेले असता आणखी पैसे गुंतवा, पैसे डबल करून देतो,जमीन खरेदी करून देतो,सोन्याचांदीचे दुकान सुरू करून देतो असे सांगून आणखीन पैसे लुबाडले तसेच पुणे पोलिसात केलेली मागे घ्यावी म्हणून दिलीप यादव याने माझ्या विरुद्ध कट रचला व साथीदारांच्या मदतीने माझी बदनामी व्हावी म्हणून एका महिलेस माझ्याविरुद्ध खोटी तक्रार द्यायला लावली अशी तक्रार महालिंग जंगम याने खालापूर पोलीस ठाण्यात दिली व त्यानुसार भा द वी स कलम ४२०.४०६.१९४.१९५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्यातील आरोपी नाशिक, पुणे, मुंबई, कल्याण अश्या विविध ठिकाणाचे राहणारे असल्याने त्यांना अटक करणे कठीण काम होते कारण एकास अटक झाली असती तर बाकीचे खबरदार होत फरार झाले असते त्यामुळे खालापूरचे पोलीस निरीक्षक अनिल विभूते यांनी पोलीस अधीक्षक अशोक दुधे. उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शुक्ला यांच्या सुचने नुसार पोलिसांची चार पथके तयार केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश कराड,शेखर लव्हे, पोलीस उपनिरीक्षक बजरंग राजपूत, महिला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती काळे, पोलीस हवालदार प्रसाद पाटील, निलेश कांबळे, अमित सावंत, पंकज खंडागळे, पोलीस नाईक सचिन व्हसकोटी, रणजित खराडे, मनोज सिरतार, ज्ञानेश्वर सहाणे, महिला पोलीस कर्मचारी हेमा कराळे, प्रतीक्षा म्हात्रे, लतिका गुरव, दिक्षिता पवार या सहकाऱ्यांची विभागून चार पथके तयार केली व सर्व आरोपींना एकाच वेळी अटक करायचे ठरवले. त्यानुसार दोन पथके पुण्याला व एक पथक मुंबई आणि एक कल्याणला रवाना झाले.

चार ही ठिकाणी सापळा लावण्यात आला आणि एकाच वेळी पाच ही जण म्हणजे पुण्यातून दिलीप यादव व सुमित सापते तर मुंबई मधून प्राची पवार व वैभव वीरकर यांना आणि कल्याण मधून बंटी उर्फ श्रीकांत गोंधळी यास ताब्यात घेऊन खालापूर ला आणण्यात आले. आज त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता पुढील तपासासाठी न्यायालयाने २४ सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.तर ती तथाकथित पीडित महिला हिस अजून नाशिक हुन अटक करणे बाकी आहे असे खालापूर पोलिसांनी सांगितले.

# वाहनचालकांनी ऑनलाईन दंड भरल्यास न्यायालयातर्फे नोटीस

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण तालुक्यातील वाहचलकांना ऑनलाईन दंड भरण्यासाठी २५ सप्टेंबरची अखेरची मुदत देण्यात आली असून,उरण न्यायालयात लोकदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. २५ सप्टेंबर पूर्वी ऑनलाईन दंड असलेल्या वाहनचालकांनी दंड न भरल्यास संबंधित वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. नवीमुंबई पोलिस आयुक्तालया अंतर्गत असणाऱ्या पोलिस वाहतूक विभागांच्या वतीने वाहनचालकांकडून प्रलंबित दंड वसुलीबाबत विशेष मोहीम राबविण्यात आलीआहे.

ऑनलाईन दंडात्मक कारवाई करण्यात आलेल्या सर्व वाहनचालकांना प्रलंबित दंड भरण्याचे आवाहन नवीमुंबई वाहतूक पोलिसांनी केले आहे.

www.mahatrafficechallan.gov.in या पेमेंट पोर्टलच्या माध्यमातून mahatraffic app द्वारे E challan devise मधून दंड भरण्याचे आवाहन २५ सप्टेंबर पर्यंतच्या मुदतीचे आवाहन करण्यात आले आहे. उरण वाहतूक शाखेने प्रलंबित दंडाची ४ लाख ६ हजार २०० रुपये तर न्हावाशेवा वाहतूक शाखेने २ लाख एवढी प्रलंबित दंडाची वसुली केली आहे.

उर्वरित वाहनचालकांनी २५ सप्टेंबर पर्यंतच्या मुदतीत ऑनलाईन दंडाची रक्कम न भरल्यास संबंधितांना उरण न्यायालयातर्फे नोटीसा येऊ शकणार आहेत.

त्यामुळे उरण न्यायालयाचे लोकअदालत होण्यापूर्वी वाहनचालकांनी प्रलंबित दंडाची रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागणार असल्याची माहिती उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक गायकवाड व न्हावाशेवा वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक निरज चौधरी यांनी दिली आहे.

# ओबीसी मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीसपदी दशरथ म्हात्रे यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीसपदी दशरथ म्हात्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज(दि. २२) येथे झालेल्या भाजप उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणी बैठकीत नियुक्ती जाहीर केली.



श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास आमदार महेश बालदी, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे, उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, विनोद साबळे, वसंत भोईर, दीपक बेहेरे, ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष मनोज भुजबळ, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा आश्विनी पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, यांच्यासह जिल्हा व तालुका मंडलातील पदाधिकारी उपस्थित होते. यापूर्वी दशरथ म्हात्रे यांनी भाजपचे पनवेल तालुका मंडल सरचिटणीस म्हणून जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. युवा संघटनात्मक कार्याची उत्तम जाण तसेच दांडगा जनसंपर्क त्यांच्याकडे आहे. समाजातील अनेक प्रश्न मार्गी लावण्यात त्यांचा सतत पाठपुरावा राहिला आहे. त्यामुळे ओबीसी सेलच्या जिल्हा सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# साखरचौथ गणेशोत्सवासाठी : ज्वेलरीचा साज असलेल्या गणेश मुर्तींना मागणी



**दै.रायगड नगरी । देवा पेरवी/प्रदीप मोकल**

वर्षभर गणेशोत्सवासाठी मुर्ती बनविण्यात व्यस्त असणाऱ्या गणेश मुर्तिकारांची आता साखरचौथ गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या मूर्ती बनविण्याची लगबग सुरू झाली असून पेण शहरास तालुक्यांतील मुर्तिकार सध्या या कामात गुंतलेले दिसून येत आहेत. तर या वर्षी कोरोनाचे प्रादुर्भामुले गणेश मुर्तींच्या उंचीवर बंधने आसल्याने फेटेवाला व ज्वेलरीचा साज आसलेल्या गणेश मुर्तींना मागणी आहे.

तालुक्यात साखरचौथ गणेशोत्सव पूर्वी फार मोठ्या प्रमाणात साजरा केला जात नसे. मात्र गेल्या पाच वर्षांपासून या उत्सवाचे स्वरुप बदलले आहे. घरगुती असणाऱ्या या उत्सवाने सार्वजनिक स्वरुप धारण केले आहे. सार्वजनिक मंडळांची संख्या गेल्या काही वर्षांपासून वाढली आहे.

मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या या साखरचौथ गणेशोत्सवासाठी येथील गणेशभक्त आगळ्यावेगळ्या गणेशमूर्ती मिळाव्यात असा आग्रह मूर्तिकारांकडे करीत असतात.

हे मूर्तिकार देखील त्यांच्या मागणीला दुजोरा देऊन विविध प्रकारच्या रेखीव मूर्ती साकारण्याच्या तयारीला लागलेले आपणास पाहायला मिळत आहेत. तालुक्यासह शहरात शेकडो साखरचौथ गणपती विराजमान होत असल्याने पेण मध्ये या उत्सवाला एक वेगळे महत्व आलेले असते.

दोन वर्षांपूर्वी एक ते दिड फुटापासून दहा ते बारा फुटापर्यंत उंची असणाऱ्या या गणेशमूर्ती बनविण्याची एक प्रकारची लगीनघाईच मूर्तिकारांची सुरू असायची. परंतु कोरोनाचे प्रादुर्भावामुळे मुर्तींच्यां उंचीवर बंधने आल्याने चार फुटापर्यंतच गणेश मुर्ती बनविल्या जात आहेत. फेटेवाला, ज्वेलरीच्या मुर्तींनाच जास्त मागणी होत आहे. साखरचौथ गणेशोत्सवाची तयारीत मुर्तिकार व भाविक तसेच मंडळाचे पदाधिकारी गुंतले आहेत. तर बाप्पाच्या मागील महिरप किंवा विविध प्रकारचे सजावटीची तयारी आता सुरु असल्याचे चित्र पेणमध्ये मूर्तिकारांच्या कारखान्यात पहावयास मिळत आहे.

> कोरोनाचे प्रादुर्भावामुळे गणेश मुर्तीच्या उंचीवर बंधने आल्याने मोठ्या मुर्तीना मागणी नसली तरी सार्वजनिक मंडळाने ज्वेलरी व कापडी धोतराच्या मुर्तीची मागणी केली आहे
>
> **जनार्दन पाटीलः मुर्तीकार**

# मुंबई मधील तिकिट चेकिंग स्टाफचा मध्य रेल्वेमध्ये DRM अवॉर्ड देऊन केला खास गौरव

**दै.रायगड नगरी । माथेरान**



रेल्वेची प्रतिमा सुधारण्यासाठी केलेल्या अतुलनीय व उल्लेखनीय कामाची दखल मध्य रेल्वे प्रशासनाने घेऊन दिनांक १८ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या मध्य रेल्वेच्या ६६ व्या रेल्वे सप्ताह निमित्त रेल्वे प्रशासनाने मुंबई विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM) शलभ गोयल यांच्या हस्ते मुंबई विभागातील १४ तिकिट चेकिंग स्टाफचा सन २०२०-२०२१ चा डि .आर.एम. अवॉर्ड रोख रक्कम व प्रशस्ती पत्र देऊन गौरव करण्यात आला .यामध्ये

संजय आंग्रे, हेड टी आय.. सी एस एम टी, एच एम मोंडकर सीटीआय, सी एस एम टी, गिरिष कदम हेड टी आय, सी एस एम टी, पी पी कोरी सीटीआय, सी एस एम टी, जसपाल सिंग राठोड ..सीटीआय कल्याण, आरसीएल सागर.. सीटीआय..अमेनिटी, दिपक के पाटील.. हेड टी आय.. दादर, सुजित मेनन ..सीटीआय.. सीएसएमटी, विशाल शिंदे ..टीटीआय..सी एस एम टी, नितीश झा ....एसआरटीसी.. कुर्ला, अस्मिता मांजरेकर ...सीटीआय..माटुंगा, बाला भूपथि ..सिटीआय.. नाहूर, संगीता मंडल ..हेडटीसी..एलटीटी, स्वप्नाली संखे.. हेडटीसी.. शिवडी

या सर्वांनी कोविडमध्ये ही रेल्वेची प्रतिमा सुधारण्यासाठी अतुलनीय व उल्लेखनीय कार्याची दखल रेल्वे प्रशासनाने घेऊन त्यांच्या कार्याचा उछच् अवॉर्ड देऊन गौरव करण्यात आला.

तिकिट चेकिंग परिवार तर्फे रेल्वे प्रशासनाचे मनःपूर्वक आभार मानून अवॉर्ड विजेते तिकिट चेकिंग स्टाफचे हरिश मोंडकर यांच्या मार्फत अभिनंदन करण्यात आले.

# विद्यार्थ्यांसाठी मोबाईलचा अतिवापर घातक ठरत आहे : असिफ कासकर

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

माहितीचे देवाणघेवाणीचे बाबतीत मोबाईलमुळे फार मोठी क्रांती होऊन सारे जग आपल्या मुठीमध्ये आले असले तरी शालेय विद्यार्थ्यांसाठी मोबाईलचा अतिवापर घातक ठरत असल्याचे प्रकर्षाने पुढे आले असल्याचे समाजसेवक असिफ कासकर यांनी शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थी वर्गाशी हितगुज करीत असताना बोलत होते.



साई फाऊण्डेशन चँरिटेबल ट्रस्ट मुंबई व नाईटिंगल चँरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्या वतीने रोहे तालुक्यातील श्रमिक विद्यालय चिल्हे येथे संपन्न झालेल्या शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे व सर्व संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी मुख्याध्यापक दीपक जगताप, जेष्ठ शिक्षक नरेंद्र माळी, सुनील थिटे, नंदकुमार मरवडे, पांडुरंग शिद आदींसह अन्य शिक्षकवर्ग उपस्थित होते.

यावेळी नाईटिंगल चँरिटेबल ट्रस्टचे चेअरमन विरेश कोठारी व साई फाऊण्डेशन चँरिटेबल ट्रस्टचे चेअरमन असिफ कासकर व पदाधिकारी तौसिफ येरुणकर यांच्या महत्वपूर्ण सहकार्याने विद्यार्थी वर्गासाठी विविध प्रकारच्या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

तर या दोन्ही ट्रस्टचे वतीने कोरोना महामारीचे कठिण काळात देखील तालुक्यातील विविध माध्यमिक व प्राथमिक शाळेतील सुमारे एक हजार विद्यार्थ्यांना अशाप्रकारचे शैक्षणिक साहित्य वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य केले आहे. विद्यार्थी वर्गाने अभ्यासावर अधिकाधिक लक्ष केंद्रित करून आपला उत्कर्ष साधावा असे शेवटी असिफ कासकर यांनी सांगितले .या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार नंदकुमार मरवडे यांनी व्यक्त केले.